क्र.पोमसं/२८/मपोकुआयो/त्रपप्र/२४३/२०१४, मुंबई, दि. ९ /६/२०१४

**परिपत्रक :**

विषय :- महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना..

****

महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या त्रयस्थ पक्ष प्रशासकपदी दि.१.७.२०१४ पासुन 'मेडी असिस्ट हेल्थकेअर सर्विसेस प्रा.लि., बँगलोर ' यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व पोलीस अधिकारी / कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना सदर कंपनीची महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेची ओळखपत्रे देण्यात येणार आहेत.

२. तरी सर्व घटक प्रमुखांना आता कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पोलीस अधिकारी / कर्मचा-यांना त्याबाबत सूचीत करावे. तसेच, त्यांच्याकडुन योजनेची नवीन ओळखपत्रे मिळण्यासाठी परिपूर्ण अर्ज भरुन घेऊन, 'मेडी असिस्ट हेल्थकेअर सर्विसेस' या कंपनीस परस्पर पाठवावीत. मेडी असिस्ट हेल्थकेअर सर्विसेस या कंपनीस ओळखपत्रे तयार करण्यास काही कालावधी लागणार असल्याने दि.३१.८.२०१४ पर्यंत प्रस्तुत योजनेच्या जुन्याच ओळखपत्रांवर रुग्णालयात दाखला देण्यात येईल. परंतु, सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या आस्थापनेवरील कार्यरत प्रत्येक पोलीस अधिकारी / कर्मचारी व त्याच्या कुटुंबियांस योजनेची नवीन ओळखपत्रे विहित मुदतीत प्राप्त करुन घ्यावीत. तसेच, सर्व घटक प्रमुखांनी योजनेच्या नवीन ओळखपत्रांसाठी विनंती अर्ज पाठविताना खालील बाबींची दक्षता घ्यावी:-

१) पोलीस अधिकारी / कर्मचारी सेवेत भरती झाल्याचा दिनांक विनंती अर्जात नमूद करण्यात यावा.

२) तसेच, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत पोलीस अधिकारी / कर्मचारी, पती / पत्नी दि.१.५.२०११ पुर्वी पहिली ३ अपत्ये व दि.१.५.२००१ नंतर २ अपत्ये, पोलीस अधिकारी/कर्मचा-यांवर अवलंबून असलेले आई / वडील (पेन्शन घेत नसलेले ), महिला पोलीस अधिकारी/कर्मचा-यांच्या बाबतीत आई - वडील किंवा सासु -सासरे हे विनाखर्च औषधोपचारास पात्र राहतील. तरी योजनेचे अर्ज पाठविताना घटक प्रमुखांनी पात्र व योग्य व्यक्तींची नावे नमुद असल्याची खात्री करावी. पात्र नसलेल्या व्यक्तीस योजनेचे ओळखपत्र दिले गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी घटक प्रमुखांची राहील, याची कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी.

३) ओळखपत्राच्या विहित नमुन्यातील अर्जात सर्व पात्र व्यक्तींचे जन्मदिनांक नमूद करण्यात यावेत. तसेच, पोलीस अधिकारी / कर्मचा-यांना सेवानिवृत्तीचा योग्य दिनांक नमूद करावा.

४) तसेच, ओळखपत्रातील विहित नमुन्यातील अर्जात सर्व माहिती अचूक, स्पष्ट व खाडा-खोड न करता भरण्यात यावी. तसेच, विहित नमुना अर्जात सध्याचे रंगीत फोटो चिकटविण्यात यावेत.

३. तरी, सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पोलीस अधिकारी / कर्मचा-यांकडुन ओळखपत्र मिळण्याबाबतचे विनंती अर्ज लवकरात लवकर प्राप्त करुन घेऊन, त्याबाबत योग्य ती खात्री करुन, सदर अर्ज व्यवस्थापक, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना, ४/बी, शासकीय अधिकारी निवासस्थान, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालयाच्या मागे, मुंबई -४०० ००१ यांचेकडे एका आठवड्यात पाठवावीत व ओळखपत्रे मुदतीत प्राप्त करुन घ्यावीत.

**(अर्चना त्यागी)**

विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)

पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, ॲ.सी.बी.,मुंबई ( सस्नेह )
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, मुंबई/
लोहमार्ग म.राज्य,मुंबई /प्रशिक्षण व खास पथकें, मुंबई / वाहतूक, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,
संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा. पुणे
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य,मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
वि.पो.म.नि. महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, म.राज्य,पुणे / ए.एन् .ओ.,नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधीनी, पुणे
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व समादेशक,रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये,
उप-प्राचार्य, गु.अ.प्र.वि., नाशिक.

प्रत सस्नेह अग्रेषित

व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य,पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ मर्या.मुंबई
महासमादेशक,गृहरक्षक दल आणि संचालक नागरी संरक्षण,म.राज्य,मुंबई
महासंचालक, व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, म.राज्य,मुंबई
संचालक, ( दक्षता व सुरक्षा अधिकारी ),महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,म.राज्य,मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,म.राज्य,मुंबई
सचिव, गृहविभाग ( विशेष ) मंत्रालय, म.राज्य,मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य मानवी हक्क आयोग,म.राज्य,मुंबई
उप संचालक, यशदा, म.राज्य,पुणे ( **रिक्तपद** )
विशेष पोलीस महानिरीक्षक व मुख्य दक्षता अधिकारी,म्हाडा,म.राज्य,मुंबई ( **रिक्तपद** )
नियंत्रक, वैद्य मापन शास्त्र,म.राज्य,मुंबई
अपर पोलीस महासंचालक, कारागृह,म.राज्य,पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, कारागृह, म.राज्य,मुंबई
पोलीस उपमहानिरीक्षक, कारागृह,नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक व दक्षता अधिकारी, विक्री कर विभाग, म.राज्य,मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक व दक्षता अधिकारी, सिडको,म.राज्य,मुंबई
सह आयुक्त व दक्षता अधिकारी, अन्न व औषधे प्रशासन विभाग, म.राज्य,मुंबई ( **रिक्तपद** )
मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, म.राज्य,मुंबई ( **रिक्तपद** )
ॲ.डी.सी., राज्यपाल, राज भवन, मुंबई
संचालक (प्रशासन)/उप निरीक्षक, पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, सुरक्षा महामंडळ, म.राज्य,मुंबई